BHARTI VIDYAPEETH'S

# MATOSHRI BAYABAI SHRIPATRAO KADAM KANYA MAHAVIDYALAY, KADEGAON.

B.V.M.B.S.K. Kanya Mahavidyalaya KADEGAON

## DEPARTMENT OF ECONOMICS

MoU Activity

DIGITAL LITERACY COMPAIGAN

JOINTLY ORGANISED

BY

DEPARTMENT OF ECONOMICS AND RURAL DEVELOPMENT FOUNDATION, CENTRE SANGLI.

IN ADPOTED VILLAGE

HINGANGAON KHURD TAL; KADEGAON



# DIGITAL LITERACY COMPAIGAN REPORT 2022-23

**BHARTI VIDYAPEETH'S**

**MATOSHRI BAYABAI SHRIPATRAO KADAM KANYA MAHAVIDYALAY, KADEGAON.**

**DIGITAL LITERACY COMPAIGAN**

**JOINTLY ORGANISED**

**BY**

**DEPARTMENT OF ECONOMICS AND RURAL DEVELOPMENT FOUNDATION IN ADPOTED VILLAGE HINGANGAON KHURD TAL; KADEGAON**

**DIGITAL LITERACY COMPAIGAN REPORT 2022-23**

भारती विद्यापीठाचे मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय, कडेगाव. अर्थशास्त्र विभाग व भारती विद्यापीठाचे ग्रामीण विकास प्रतिष्ठान केंद्र सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल साक्षरता कार्यक्रमांतर्गत कडेगांव तालुक्यातील हिंगणगाव खुर्द येथे अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा.संजय ठिगळे यांचे 'डिजिटल साक्षरता' या विषयावर शनिवार दि.२५ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी १० वाजता हिंगणगाव खुर्द ग्रामपंचायतीच्या सभागृहात व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.वाय.कदम होते.प्रारंभी उपस्थितांचे स्वागत प्रा.अशोक माळी यांनी केले. याप्रसंगी प्रा.श्रीकृष्ण मोहिते सरपंच सौ.प्रियांका शेटे,यांनी मनोगत व्यक्त केले.

मार्गदर्शनपर भाषणात प्रा.संजय ठिगळे म्हणाले की,अलीकडच्या काळात वाढत चाललेली आर्थिक फसवणूक हि चिंतेची बाब असून त्यावर आर्थिक साक्षरता आणि डीजीटल साक्षरता हाच रामबाण उपाय आहे.त्यासाठी समाजातील विविध घटकांनी एकत्रित येऊन काम करण्याची नितांत गरज आहे.प्रा.श्रीकृष्ण मोहिते म्हणाले की,डिजिटल साक्षरता जेवढी महत्वाची तेवढेच डिजिटल डीटोक्सही महत्वाचे आहे.सरपंच सौ.प्रियांका शेटे म्हणाल्या की,डिजिटल साक्षरतेच्या मोहिमेत गावाचे पूर्ण सहकार्य राहील.अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ.व्ही.वाय.कदम म्हणाले की,ग्रामीण विकासाच्या दृष्टीने डिजिटल साक्षरतेचे महत्व ओळखून तरुणाईने घरोघरी जाऊन प्रबोधन करण्याची गरज आहे. अद्यावत तंत्रज्ञान समजावून घेणे आणि समजावून सांगणे हेच कार्य वेगळ्या पद्धतीने करावे लागेल.कार्यक्रमास उपसरपंच सौ.रुपाली जाधव,मा.अशोक जाधव, डॉ. सविता माळी. त्याचबरोबर गावातील विविध संस्थाचे अधिकारी,पदाधिकारी,ग्रामस्थ त्याचबरोबर अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थिनी उपस्थित होत्या. उपस्थित्तांचे आभार प्रा.अविनाश यादव यांनी मानले. कार्यक्रमानंतर विद्यार्थीनींनी हिंगणगाव खुर्द गावातील विविध दुकानांमध्ये, रेशन दुकान व शाळांना भेटी दिल्या. आबालवृद्ध, तरुणाई त्याचबरोबर अनेक गृहिणीशी सुसंवाद साधला.एवढेच नव्हे तर त्यांना डिजिटल व्यवहार कसे करावेत या विषयी माहिती समजावून सांगितली. सदरच्या उपक्रमात अर्थशास्त्र विभागाच्या 40 विद्यार्थीनी दोन प्राध्यापक आणि १२५ ग्रामस्थ सहभागी झाले.

## DIGITAL LITERACY CAMPAIN IN HINGANGAON KHURD (KADEGAON)

B.V.M.B.S.K. Kanya Mahavidyalaya * KADEGAON




**DELIVERED LECTURE ON DIGITAL LITERCY BY PROF.SANJAY THIGALE.**




**PRESIDENTAL ADDRESS BY PRINCIPAL PROF DR.V . Y. KADAM**



**ACTIVE PARTICIPATION IN DIGIRAL LITERACY PEOGRAMME**

B.V.M.B.S.K. Kanya Mahavidyalaya
KADEGAON



ACTIVE PARTICIPATION OF STUDENTS



# कन्या महाविद्यालयाच्या वतीने हिंगणगाव खुर्द मध्ये डिजिटल साक्षरता अभियान

कडेगाव दि. १ (वार्ताहर) – भारती विद्यापीठाच्या मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालयाचा अर्थशास्त्र विभाग आणि भारती विद्यापीठाचे ग्रामीण विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने कडेगाव तालुक्यातील हिंगणगाव खुर्द येथे डिजिटल साक्षरता अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ लेखक व अर्थशास्त्राचे अभ्यासक प्रा. संजय ठिगळे यांचे 'डिजिटल साक्षरता' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ.व्ही. वाय. कदम होते.

मार्गदर्शनपर भाषणात प्रा. संजय ठिगळे म्हणाले की, शाश्वत ग्रामीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी आर्थिक व डिजिटल साक्षरतेवर अधिक भर देण्याची गरज आहे. या राष्ट्रीय कार्यात देशातील तरुणाईने सक्रिय होण्याची गरज आहे.

या प्रसंगी बोलताना प्रा. श्रीकृष्ण मोहिते म्हणाले की, डिजिटल साक्षरते बरोबरच डिजिटल डिटॉक्सवर भर देण्यात यावा. अध्यक्ष पदावरून बोलताना प्राचार्य डॉ.व्ही.वाय.कदम म्हणाले की, माहिती तंत्रज्ञानाच्या युगात डिजिटल साक्षरतेचा अभाव असणे हे देशाच्या विकासाला मारक आहे. त्यामुळेच डिजिटल साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमास हिंगणगावच्या सरपंच सौ प्रियंका शेटे, उपसरपंच सौ. रुपाली जाधव, माजी सरपंच श्री अशोक जाधव, प्रा. डॉ. सविता माळी,ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. अशोक माळी यांनी केले. तर आभार प्रा.अविनाश यादव यांनी मानले.